खरेदीखत **मौजे मेहरुण** शिवारातील तालुका व जिल्हा जळगांव येथील, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील **" कृपा अपार्टमेंट"** या इमारतीतील रहीवासी फ्लॅट जागेची किंमत रूपये /- अक्षरी रूपये मात्रचे आज दिनांक नोव्हेंबर २०१९ रोजी लिहुन दिले असे.

श्री.
उ.व.- , व्यवसाय - व्यापार,
रा. **लिहून घेणार**
Pan -
Aadhaar No.

१) अब्राहम थॉमस (मुल्लेस्सेरील),
उ.व.- ५६, व्यवसाय - व्यापार,
Pan-AAPPA5373C, Aadhaar No. 8874 8686 8541 **लिहून देणार**
२) अन्नम्मा जॉर्ज अब्राहम,
उ.व.- ५४, व्यवसाय - व्यापार,
Pan-AAXPA3125D, Aadhaar No. 3621 5956 6737

कारणे खरेदीखत लिहून देतोत की, आमचे स्वसंपादीत, सामाईक मालकीची, वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील खालील वर्णन केलेली स्थावर मिळकत फ्लॅट सिस्टीमचे इमारतीतील, **" कृपा अपार्टमेंट"** मधील फ्लॅट घरजागा, सामाईक सुखसाईतील अविभाज्य हिश्याचे वापर हक्कासह आम्ही तुम्हांस किमत रक्कम रूपये /- अक्षरी रूपये मात्रवर कायम स्वरुपी पुर्ण मालकी हक्काने खुश खरेदी देऊन आज रोजी त्या स्थितीत तुमचे प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात दिली आहे. व तुम्ही प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात घेतली असुन सदर मिळकतीस तुम्ही तुमचे मालकीचे कुलुप लावलेले आहे.

-: त्या स्थावर मिळकतीचे वर्णन :-

तुकडी जिल्हा जळगांव, पोट तुकडी तालुका जळगांव, सब.रजिस्ट्रेशन ऑफीस जळगांव पैकी मौजे मेहरुण शिवारातील, जळगांव महानगरपालिका हद्दीतील विभाग क्र. ७/१८१ मधील -

मौजे मेहरुण शेत सर्व्हे नंबर १८८/१/अ/१/ब, यात मे. जिल्हाधिकारी साहेब जळगांव यांचेकडील बिनशेती हुकूम क्रमांक - आर.बी./ एल.एन.ए./एस.आर./११७/८१, दिनांक २४/ ०९ / १९८१ चे हुकूमाप्रमाणे व त्यांनी मंजुर केलेल्या नकाशानुसार बखळ प्लॉटस् पाडलेले आहे. त्या बखळ प्लॉटस् पैकी -

बखळ प्लॉट नं ८ (आठ) याचे क्षेत्र ३५०.०० चौरस मीटर

- : याची लांबी रुंदी :-

पुर्व पश्चिम बाजू - १७.५० मीटर, दक्षिणोत्तर बाजू - २०.०० मीटर.

- : यास चतु:सिमा :-

पुर्वेस	- प्लॉट नं. ९,	पश्चिमेस -	सर्व्हे नं. १६३/२,
उत्तरेस	- प्लॉट नं. ६ व ७,	दक्षिणेस -	९ मी. रुंद रोड रस्ता.

येणे प्रमाणे चतु:सिमेतील प्लॉट जागेचे खरेदीखत मी दस्त नं. १३७६, दि.२०/५/२००२ अन्वये नोंदविले असुन त्यावर टि.डी.आर. क्षेत्र १०७.४० चौरस मीटरचे दस्त क्र. ४९, दि. ०२/०१/२०१८ अन्वये खरेदीखत नोंदविले आहे. सदर प्लॉट जागेवर बांधकाम करणेसाठी मी मे. आयुक्त सो., जळगांव शहर महानरपालिका, जळगांव, यांचेकडील कमेन्समेंट सर्टीफीकेट नं. टी.पी./बी.पी./१२९२, तारीख १४ / ०३ / २०१८ अन्वये बांधकामाची परवानगी घेऊन व नकाशा मंजुर करुन घेतला आहे. पार्कींग फ्लोअर, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला व चौथा मजला याप्रमाणेफ्लॅट सिस्टीम इमारतीचे बांधकाम केलेले असुन सदर संपूर्ण इमारतीमध्ये एकुण १६ (सोळा) फ्लॅटसचे बांधकाम केलेले आहे. व सदर संपूर्ण बांधकामास **" कृपा अपार्टमेंट "** असे नांव दिलेले आहे. त्या संपुर्ण फ्लॅट सिस्टीमचे इमारतीपैकी :-

पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक :

याचे कारपेट क्षेत्र **चौरस मीटर असुन बांधीव क्षेत्र** **चौरस मीटर आहे** **व प्लॉट जागेतील अविभाज्य क्षेत्र** **चौरस मीटर आहे.**

सदर फ्लॅट जागेत एक लिव्हींग रुम, एक किचन रुम, एक डायनिंग रुम, एक बाथरुम, एक डब्ल्यु.सी. व त्यासमोरील पॅसेज असे बांधकाम केलेले आहे.

सदर फ्लॅटमध्ये इलेक्ट्रीक फिटींग व नळ फिटींग केलेली असुन त्यास लागणारे इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन व नळ कनेक्शनही घेतलेले असुन ते तुम्ही तुमचे खर्चाने तुमचे नावे तबदील करुन घ्यावयाचे आहे.

तसेच सदरचे सदर इमारतीतल सामाईक क्षेत्र व सुविधा ह्या इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी सामाईकात असुन त्या सामाईक सुखसोईत तुमचे फ्लॅट जागेचा % अविभाज्य हिस्सा रहावयाचा आहे व तो तुम्हांस विभागुन मागता येणार नाही.

- : यास चतु:सिमा :-

पुर्वेस	-	पश्चिमेस	-
उत्तरेस	-	दक्षिणेस	-

येणे प्रमाणे चतु:सिमेतील फ्लॅट जागा, आतील दगड, माती, जमीन, विटा, सिमेंट, लोखंड, इमला, दरवाजे, खिडक्या, कपाटे, इलेक्ट्रीक फिटींग, नळ फिटींग, एक इले.मीटर कनेक्शन व नळ कनेक्शन तसेच तसेच **" कृपा अपार्टमेंट "** मधील सर्व धारकांसाठी असलेल्या सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे वापर हक्कासह व तदंगभुतवस्तुसुध्दा आम्ही तुम्हांस आज रोजी रक्कम रु. /- अक्षरी रुपये

मात्रवर पुर्ण मालकी हक्काने कायम खुश खरेदी देऊन आज रोजी तुमचे प्रत्यक्ष कब्जे वहीवाटीत व ताब्यात दिली. त्याबद्दल तुम्ही आम्हाला खालीलप्रमाणे भरणा दिला तो असा.

-: भरण्याचा तपशील :-

रु. /- एकुण अक्षरी रुपये मात्रचा भरणा पावला. तो आम्ही आमचे हिस्सेराशीप्रमाणे वाटुन घेतला. आता सदर भरण्याबद्दल व किमतीबद्दल आमची कोणतीही तक्रार राहीलेली नाही.

आता सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या फ्लॅट जागेचे तुम्ही या खरेदीखताने पुर्ण व कायमचे मालक व कब्जेदार झाला आहात सबब सदर स्थावर मिळकतीचा तुम्ही वंश परंपरा उपभोग घ्यावा अगर तुमचे मर्जीनुरुप विनीयोग करावा.

सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या मिळकतीवर आता आमचा अगर आमचे वंशवारसदार, नातेवाईक, भाऊबंद, बहीणी, भागीदार, असायनी, ट्रान्सफरी वगैरे कोणाचाही काही एक मालकी हक्क अथवा हितसंबंध राहिला नाही. तसा तो कोणी दाखविल्यास तो या खरेदीखतान्वये रद्दबातल समजण्यात यावा.

सदर वर सविस्तर वर्णन केलेली फ्लॅट घरजागा आम्ही यापुर्वी कोठेही गहाण, दान, खरेदी, बक्षिस, लीज, विक्री, तारण, अगर अन्य बोजात, करारात, हक्कसंबंधात, जप्तीत, अदलाबदलखत, जामीनकीत, कोर्टकारवाईत वारसाहक्कात, मृत्युलेखात अथवा कोणत्याही बोज्यात अगर जडजोखमी मध्ये अडकविलेली नाही. सदर फ्लॅट मिळकतीस क्लिअर टायटल आहे. याही उपर तसे काही निघाल्यास त्याचे निवारण आम्ही आमचे खर्चाने करुन देऊ. त्याची सर्व जबाबदारी आमचेवर राहील. त्याचे खर्चाची कोणतीही तोशीष तुम्हास लागु देणार नाही.

सदरचे खरेदीखतान्वये वर सविस्तर वर्णन केलेल्या मिळकत फ्लॅट घरजागेचे तुम्ही पुर्ण मालक व कब्जेदार झाला आहात. सबब आता तुम्ही सरकारी रेकॉर्डवर व ७/१२ उता-यावर, प्रमाणे तुम्ही मालक व कब्जेदार म्हणून तुमचे

नांव लावुन घ्यावे. त्यासाठी माझ्या सह्यांची जेथे जेथे आवश्यकता आहे, तेथे तेथे आम्ही तुम्हांस विनामुल्य सह्या दिलेल्या आहेत. याही उपर भविष्यात सदर मिळकतीसंबंधात आमच्या सह्यांची काही एक आवश्यकता पडल्यास त्या आम्ही तुम्हांस विनामुल्य सह्या देऊ.

सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या प्लॉट जागेवर एकुणात १६ (सोळा) फ्लॅटस् घरजागेचे बांधकाम केलेले आहे. व सदरचे संपूर्ण बांधकामास " **कृपा अपार्टमेंट** " असे नांव दिलेले आहे. व सदर इमारतीबाबतचे घोषणापत्र दिनांक / / २०२० रोजी महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम व महाराष्ट्र वेश्म मालकी नियम यांचे तरतुदीनुसार मे. सब-रजिस्ट्रार जळगांव यांचे कार्यालयात नोंदविलेले आहे. सदर " **कृपा अपार्टमेंट** " साठी अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन स्थापन झालेली आहे व त्यात तुम्हांस सभासद करुन घेतलेले आहे. सबब असोसिएशनचे व घोषणापत्रातील नियम, अटी व शर्ती यापुढे मालक व कब्जेदार म्हणुन तुमचेवर बंधनकारक राहतील.

सदर " **कृपा अपार्टमेंट** " या इमारतीचे नोंदणीकृत केलेल्या घोषणापत्रात नमद केल्याप्रमाणे तुमचे सदरचे अपार्टमेंट / फ्लॅटसाठी सामाईक सुखसोईत तुमचे फ्लॅट मिळकतीचा असलेला % असलेला अविभाज्य हिस्सासुध्दा तुम्हांस या खरेदीखताने तबदील केलेला आहे व तो तुम्हांस कधीही विभागुन मागता येणार नाही.

- : अटी व शर्ती :-

१) सदर सविस्तर वर्णन केलेली स्थावर मिळकत फ्लॅट घरजागा मौजे मेहरुण शिवारातील, मे. कलेक्टर सो. जळगांव, शहर महानगरपालिका जळगाव, टाऊन प्लॅनिंग जळगांव यांचे हद्दीतील आहे. सबब त्यांचे कडील सर्व हुकुम, नियम, अटी व शर्ती मालक व कब्जेदार म्हणुन तुमचेवर बंधनकारक राहतील.

२) सदर " **कृपा अपार्टमेंट** " या इमारतीतील तुम्हांस आज रोजी खरेदी दिलेल्या फ्लॅट जागेचा उपभोग तुम्ही इतर फ्लॅट धारकांना त्रास होणार नाही अशारितीने वापर वहीवाट करावयाचा आहे. तसेच सदर सदर फ्लॅट सिस्टीमचे इमारतीस धोका पोहचेल किंवा तिच्या मुळ स्वरुपात फरक पडेल असे कोणतेही कृत्य तुम्हांस करता येणार नाही.

३) सदर इमारत " **कृपा अपार्टमेंट** " मधील तुम्हांस खरेदी दिलेल्या फ्लॅटस् मिळकतीमध्ये मुळ मालकांचे पुर्व परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारचे पक्क्या अगर मुलभुत स्वरुपाचे फेरबदल अगर बांधकाम प्रोजेक्शन वगैरे करता येणार नाही. मात्र सदर फ्लॅटचे आतील भागात तात्पुरत्या स्वरुपाचे सुखसोई तुम्ही करु शकतात यास परवानगीची आवश्यकता राहणार नाही.

४) सदर इमारत " **कृपा अपार्टमेंट** " मधील सर्व सामाईक सुखसोईची साफसफाई, दुरुस्ती, बिघाड, सुधार व मेंटेनन्ससाठी द्यावा लागणारा सामाईकातील खर्च तुम्ही तुम्ही हिस्सेराशीप्रमाणे वेळचेवेळी सदरचे असोसिएशनला द्यावयाचा आहे.तसेच सदर इमारतीतील सामाईक सुखसोई चालु व सुस्थितीत ठेवण्याची सर्वस्वी जबाबदारी तुम्ही व सदर इमारतीतील इतर फ्लॅट धारकांवर आहे व राहील.

५) सदरचे खरेदीखताने तुमचे प्रत्यक्ष मालकी हक्काने ताब्यात व कब्जे वहीवाटीत दिलेल्या उपरोक्त फ्लॅट मिळकतीचे आतील सर्व रिपेअर्स व मेंटेनन्स मालक व कब्जेदार म्हणुन तुम्ही स्वत: करावयाचे आहे.

६) सदर खरेदीखतास कायद्यानुसार जोडावे लागणारे ७/१२ उतारा, कमेन्समेंट सर्टीफीकेट, आर्कीटेक्ट सर्टीफीकेट व नकाशाची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे.

७) सदर " **कृपा अपार्टमेंट** " या इमारतीचे नोंदणीकृत केलेल्या घोषणापत्रात सविस्तर वर्णन केल्याप्रमाणेच्या सामाईक क्षेत्र व सुविधा तसेच मर्यादीत सामाईक क्षेत्र व सुविधा हे सदर इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांवर बंधनकारक आहे व राहील. सबब त्याबाबत तुम्हांस काही एक हरकत घेता येणार नाही. घोषणापत्राची एक प्रत तुमचे भोगवट्यास दिलेली आहे.

८) सदर वर सविस्तर वर्णन केलेली बांधीव फ्लॅट घरजागा आम्ही तुम्हांस खरेदी देण्यापूर्वी तुम्ही प्रत्यक्ष जागेवर जाऊन व सदर फ्लॅट मिळकतीचे अवलोकन करुन, सदर फ्लॅट मिळकत सुस्थितीत व तुम्हांस देऊ केलेल्या सुखसोईनुसार व कराराप्रमाणे असल्याची तुमची खात्री झालेली असल्यानंतर व सदर स्थावर मिळकतीबाबतचे सर्व दस्तऐवज बघुन खात्री करुन घेतलेनंतरच सदरचे खरेदीखत आज रोजी तुम्हांस राजीखुशीने लिहुन नोंदवून दिले जात आहे. व सदरची फ्लॅट जागा तुमचे ताब्यात व कब्जे वहीवाटीत घेतलेली आहे. सबब खरेदीखतापासून सदर फ्लॅट

घरजागेत काही एक दुरुस्ती करावी लागल्यास त्याकामी येणार संपुर्ण खर्च तुम्ही लिहुन घेणार यांनीच करावयाचा आहे. त्याबाबतच्या दुरुस्तीची काही एक जबाबदारी मी लिहुन देणार यांचेवर नाही व पुढेही राहणार नाही.

९) तुम्ही लिहुन घेणार फ्लॅट धारक कोणत्याही प्रकारचे टाकाऊ पदार्थ, वस्तु अगर घाण किंवा घाणपाणी सदर इमारतीचे खुल्या जागेत फेकता अगर टाकता येणार नाही. तसेच तुमचे फ्लॅटचे बाल्कणीमध्ये तुम्ही कपडे धुणे वगैरे कामे करावयाचे नाही. सदर इमारतीचा परिसर स्वच्छ, सुंदर ठेवण्याची जबाबदारी तुमचेवर व सदर इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांवर आहे व राहील. तुम्हांस असे कोणतेही कृत्य करता येणार नाही ज्याने इमारतीची शांतता भंग होईल अगर परिसरात घाण, प्रदुषण होईल.

१०) सदर फ्लॅटमध्ये तुम्हांस कोणत्याही प्रकारचे ज्वालाग्राही स्फोटक, अंमली, नशिली दारु अगर धोका उपद्रवकारक, कायद्याने निशिध्द ठरवलेला व्यवसाय अगर पदार्थाचा साठा करता येणार नाही. तसे काही केल्यास त्यास तुम्हीच सर्वस्वी जबाबदार रहाल.

११) सदरचे खरेदीखतान्वये तुम्हांस खरेदी देत असलेल्या फ्लॅट मधील बाथरुम व डब्ल्यु.सी.मध्ये लिकेजेस झाल्यास त्याचे त्वरीत तुम्ही तुमचे खर्चाने दुरुस्ती करावयाची आहे. ज्यामुळे तुमचे फ्लॅटचे खालील फ्लॅट धारकांना त्रास होणार नाही.

१२) सदर **" कृपा अपार्टमेंट "** या इमारतीतील सर्व धारकांसाठी एक समाईकात थ्री फेज इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन असुन ते सामाईक वापराची जागा, पार्कींग, जिना वगैरे ठिकाणी दिवे लावणेकामी, बोअरवेलचे पाणी ओव्हरहेड पाण्याचे टाकीत लिफ्ट करणेकामी, इमारतीतील लिफ्टचे कामी दिलेले आहे. तसेच सामाईकात एक मनपा पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे. सबब सदरचे सामाईकात दिलेल्या इलेक्ट्रीक मीटर कनेक्शनचे व पिण्याचे पाण्याचे वेळचेवेळी येणारे बील इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांनी मिळून हिस्सेराशीने भरावयाचे आहे व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांवर आहे व राहील.

१३) सदर **" कृपा अपार्टमेंट "** या इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी एक लिफ्टची व त्यास अनुसरुन इन्व्हर्टर बॅटरी बॅक-अपसहची व्यवस्था करुन दिलेली आहे. मात्र सदरचे लिफ्टकामी येणारा सुधार, बिघाड, दुरुस्ती खर्च तसेच इन्व्हर्टर बॅटरी बॅक आपचे मेंटेनन्स खर्च वगैरे इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांनी सामाईकात हिस्सेराशीने करावयाचा आहे. सबब त्याबाबतची काही एक जबाबदारी मी लिहुन देणार यांचेवर राहणार नाही.

१४) सदर संपुर्ण इमारत **" कृपा अपार्टमेंट "** ची गच्चीची मालकी व कब्जा आम्ही लिहुन देणार यांचेच मालकीची आहे व राहील. तसेच सदर गच्चीचा वापर आम्हाला योग्य वाटेल त्या रितीने करण्याचा आम्हांला पूर्ण हक्क आहे व राहील. व तसा तो अधिकार आम्ही आमचेकडे सुरक्षित आहे. सबब सदर बाबत तुम्हांस व इमारतीतील इतर फ्लॅट धारकांना काही एक अडीअचडण अगर हिला हरकत सांगता किंवा मागता येणार नाही. व ही अट मान्य करुनच तुम्ही सदर मिळकत खरेदी केलेली आहे.

१५) सदरहु **" कृपा अपार्टमेंट "** या इमारतीमधील आज रोजी एक एफ.एस.आय. + टि.डी.आर. नुसार सदर फ्लॅट इमारतीचे बांधकाम केलेले आहे. सबब भविष्यात कायद्याचे तरतुदीनुसार जास्तीचा एफ.एस.आय. किंवा टि.डी.आर. नुसार जास्तीचा एफ.एस.आय.उपलब्ध झाल्यास त्या जास्तीच्या किंवा उपलब्ध होणाऱ्या एफ.एस.आय. ची मालकी व कब्जा आम्ही लिहुन देणार यांचाच रहावयाचा आहे. सबब सदरच्या एफ.एस.आय.किंवा टि.डी.आर नुसार सदर इमारतीचे गच्चीवर बांधकाम करण्याचा व ते बांधकाम खरेदी घेणारे इसमांना तबदील करण्याचा हक्क व अधिकार आहे व राहील. तसेच सदर इमारतीचे गच्चीवर भविष्यात बांधले जाणारे फ्लॅट धारकांना सदर इमारतीसाठी असलेल्या सामाईक सुखसोईंचा उपभोग घेण्याचा हक्क व अधिकार रहावयाचा आहे व राहील. तसेच सदर इमारतीचे गच्चीवरील बांधकामासाठी आवश्यक ते सर्व प्रकारचे सहकार्य तुम्हांस द्यावे लागेल. व ते तुम्ही मान्य करुनच सदरचे खरेदीखतावर सही केलेले आहे.

१६) सदर फ्लॅट बाबतचे बांधीव व खुल्या जमिनी बाबतचे आजपावेतोचे शेतसारा, बदलुसारा, खुला भुखंड कर, घरपट्टी, इले.बील व इतर सरकारी-निमसरकारी कर, महानगरपालिका कर वगैरे मी भरलेले असुन यापुढील येणारे सर्व कर

मालक व कब्जेदार म्हणुन तुम्ही भरावयाचे आहेत. सर्व कर भरणा पावतीची छायांकीत प्रत तुमच्या भोगवट्यास दिली आहे.

१७) सदरचा खरेदीखताचा व्यवहार आपलेसह उभयंताचे सर्व वंशवालीवारसांवर, नातेवाईक, भाऊबंद, बहीणी, वगैरे यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

१८) सदरचे खरेदीखतासाठी लागणारा संपुर्ण खर्च जसे -स्टॅम्प, रजिस्ट्रेशन फी, कॉम्प्युटर चार्जेस, झेरॉक्स चार्जेस व इतर अनुषंगीक खर्च तुम्ही लिहून घेणार यांनीच केलेला आहे.

१९) सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या फ्लॅट घरजागेची चालु बाजार भावाप्रमाणे किंमत रु.
/- मात्र असुन आहे. सबब सदरचे किमतीवर मुंबई स्टॅम्प ॲक्ट, १९५८ चे कमल २५(ड) मधील सुधारीत तरतुद व अर्बन डेव्हलपमेंट डिपार्टमेंट मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेशानुसार ६% प्रमाणे मुद्रांक शुल्क व १% प्रमाणे नोंदणी कामीचे चलन सदरचे खरेदीखतासोबत जोडलेले आहे.

वरील प्रमाणे संपूर्ण रक्कमेचा भरणा पावला. भरण्याबद्दल आम्हाला कोणतीही तक्रार राहीलेली नाही. व बांधीव फ्लॅट घरजागेचा तुम्हांस कब्जा दिला. व सदर फ्लॅट घरजागेस तुम्ही तुमचे मालकीचे कुलुप लावलेले आहे. सबब कब्जाबद्दल तुमची कोणतीही तक्रार राहीली नाही.

सदरचे खरेदीखत आम्ही राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजुन- उमजुन, वाचुन घेऊन, कुणाचेही दबावास बळी न पडता, पुर्ण शुध्दीत व चांगल्या मानसिक अवस्थेत उभय साक्षीदारांसमक्ष सह्या करुन आज रोजी लिहुन व नोंदवून दिले असे.

लिहून देणार - स्वाक्षरी *फोटो* *नि.डा.अंगठा*

....

१) अब्राहम थॉमस (मुल्लेस्सेरील),

....

२) अन्नम्मा जॉर्ज अब्राहम

लिहून घेणार - स्वाक्षरी *फोटो* *नि.डा.अंगठा*

....

श्री.

----: साक्षीदार :----

१)-----------------------

नांव -

वय -

पत्ता -

२) ---------------------------

नांव -

वय -

पत्ता -